(कार्यालयीन कामासाठी)

(नगरसचिव कार्यालय)

मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव.

मौलाना अबुल कलाम आजाद प्रशासकीय भवन,भुईकोट किल्ल्या समोर, रविवार वॉर्ड,ता. मालेगाव.

महासभा ऑक्टोबर -२०२६

सभा क्र.०७

सुचना

कार्यपत्रिका क्र.०७

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ महापालिकेचे कामकाज नियम क्र.१ (क) अन्वये, मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार मालेगाव शहर महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण **सभा क्र. ०७ दिनांक २९/१०/२०२६, गुरूवार रोजी दु.४:०० वा** महानगरपालिकेच्या साथी निहाल अहमद सभागृह येथे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. करीता सर्व सन्माननीय पालिका सदस्य व सर्व संबंधितांना विनंती की, प्रायोजित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहुन सहकार्य करावे.

सदर सभेस खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्र. ९४ (मागील सभेचा तहकुब विषय) :- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./नगररचना / १८ / दि. ११/०८/२०२६ अन्वये, महानगपालिका क्षेत्रातील कँम्प वार्डातील सि.स.नं.१०३७/२/१, सि.स.नं.१०३७/२/२, व सि.स.नं.१०३७/२/३ (जुना स.नं.२७/अ) मधील अंदाजित क्षेत्र २४२००.०० चौ.मि. या जागेचे मालक श्री.महेश तुळशीराम पाटोदिया यांनी त्यांचे मालकीचे क्षेत्र संपादन करणेकामी दि.२८/१०/२०२५ रोजी म.प्रा.नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना बजावली आहे. त्यानुसार सदरची जमीन भुसंपादन करणेकरीता मा.जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव सादर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ९५:- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./आस्थापना /२५ / दि. १६/१०/२०२६ अन्वये, मालेगाव महानगर पालिकेतील सेवा विषयक प्रशासकीय सुधारणातंर्गत आरोग्य, दवाखाना,व इतर विभागांचे सेवाप्रवेश नियम, सुधारीत आकृतीबंध प्रस्ताव म.शासनास मान्यतेसाठी सादर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ९६:- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./सा.बा.वि./२४/ दि.१६/१०/२०२६ अन्वये, मा.सदस्यांचे मागणीप्रमाणे मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी कृत्रिम गणेशकुंड उभारणेकामी व विस्तार करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ९७:- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./सा.बा.वि./२१/ दि.१५/१०/२०२६ अन्वये, मा.डॉ.शोभा दिनेश बच्छाव खासदार, धुळे लोकसभा यांचे मागणीनुसार दलितेत्तर सुधार योजनेंतर्गत शासनाचे बांधकाम विभागाकडून मनपा क्षेत्रातील कामे प्रस्तावित करण्यात आली असून याकामी देखभाल हमी पत्र देणेकामी, तसेच आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./सा.बा.वि./२०/ दि.१५/१०/२०२६ अन्वये, मा.डॉ.शोभा दिनेश बच्छाव खासदार, धुळे लोकसभा यांचे मागणीनुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत शासन निर्णयातील अ.क्र.०७ अ नुसार प्रस्तावीत कामाची "निवड निश्चिती" करणेकरीता प्रस्तावित कामे मंजूर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे. तसेच आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./सा.बा.वि./२१/ दि.१५/१०/२०२६ अन्वये, मा.डॉ.शोभा दिनेश बच्छाव खासदार, धुळे लोकसभा यांचे मागणीनुसार मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील मौजे माळदे क्षेत्रातील गट नं.४ मध्ये महामार्गापासून काही अंतरावर गिरणा नदी लगत गायराण जागा मल्टीस्पेशालिस्ट कॅन्सर साठी शासकीय जागा जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांना हस्तांतर करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ९८:- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./सा.बा.वि./२६/दि.२२/१०/२०२६ अन्वये, मालेगाव महानगर पालिकेच्या शाळांची अवस्था बिकट झालेली आहे. मनपा चे शाळांची दर्जोन्नती करणे आवश्यक असल्याने मनपास अद्ययावत व सुसज्ज शाळा उभारण्याच्या दृष्टीकोनातून प्रथम टप्प्यात ०८ शाळा नव्याने बांधणेकामी प्रस्ताव तयार करण्यात आला असून प्रस्तावित शाळांसाठी म.शासनाकडून अनुदान प्राप्त करणेकरीता प्रस्ताव सादर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ९९:- मा.महापौर यांचे शिफारशीने, व श्री.मोहम्मद खालिद अब्दुल रशीद, श्री.निलेश भगवान आहेर, श्री.अन्सारी मो.असलम खलील अहमद व श्री.मदन बाबुलाल गायकवाड यांचे यादी अन्वये मालेगाव महानगरपालिकेतील सर्व कर्मचारी तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी मानधन कर्मचारी यांना ईद, दिवाळी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सणानिमित्त सानुग्रह अनुदान देणेकामी तसेच मानधन कर्मचाऱ्यांचे इतर समस्यांबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १००:- मा.महापौर यांचे प्रस्तावान्वये, मौजे म्हाळदे येथील गट क्र.०४/ब/१/अ/१ क्षेत्र १६ हे. ३२ आर. पैकी क्षेत्र २० एकर (८ हे.० आर.) हे क्षेत्र कब्रस्थानासाठी जमैयत एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर सोसायटी यांना कब्रस्थान करीता ना-हरकत दाखला देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०१:- मा.महापौर यांचे शिफारशीने, घोडके लता सखाराम यांचे यादी अन्वये, मालेगाव शहरातील मोसमपुल येथील महात्मा ज्योतिबा फुले चौक रूंदीकरण करून सुशोभिकरण करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०२:- मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मदन बाबुलाल गायकवाड यांचे यादी अन्वये मौजे संगमेश्वर स.नं.५३,५४,५५,५६ व ८१ मधील सार्वजनिक आरक्षणांचे बेकायदेशीर रहीवाशी रूपांतरण आदेश स्थगित करणेकामी व प्रकरणाची उच्चस्तरीय सखोल चौकशी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०३:- मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.अन्सारी मो.असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये मालेगाव महानगरपालिकेच्या अलीअकबर हॉस्पीटलच्या कामांबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे. तसेच वाहन विभागाकडील चालक कर्मचारी यांचे वाहनांच्या वारंवार दुरूस्तीच्या अनुषंगाने चौकशी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०४:- मा.महापौर यांचे शिफारशीने,श्रीमती आम्रपाली सचिन बच्छाव यांचे यादी अन्वये, अल्पसंख्यांक योजनेंतर्गत प्रभाग क्र. ०१ मधील हिम्मत नगर कब्रस्थान येथे सुविधा पुरविणेकामी प्रस्ताव सादर करणे.

विषय क्र. १०५:- मा.महापौर यांचे शिफारशीने,श्री.अन्सारी मो.असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये, म.शासनाकडून द्रारीद्र्य रेषेखालील यादीत समाविष्ठ असलेल्या लाभार्थ्यांना आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेकडून दारीद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र वितरीत करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे व महानगरपालिका वार्षिक अंदाजपत्रकातील दिव्यांगांसाठीच्या तरतुदी नुसार दिव्यांगाकरीता शिष्यवृत्ती योजना, दिव्यांगासाठी मदत साहित्य व दिव्यांगासाठी वैद्यकीय तपासणी व इतर आवश्यक सुविधा पुरविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०६:- मा.महापौर यांचे शिफारशीने ,श्री.अन्सारी निहाल अहमद मो.सुलेमान यांचे यादी अन्वये ख्वाजा गरीब नवाज पुलाच्या खालील जागा टॅक्सी स्टॅन्ड, रिक्षा स्टॉप व वाहतूक पोलिस चौकीसाठी जागा निश्चित करणेकामी तसेच श्री.उध्दव उमाकांत दरेकर यांचे यादी अन्वये,दरेगाव येथील गट नं. ८३ येथील वन विभागाची डोंगरावरील जागा महानगरपालिकेस हिल स्टेशन गार्डन तयार करणेकामी लीज/भाडेतत्वावर घेणेकामी व दरेगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेची जीर्ण झालेली इमारत पाडून त्या ठिकाणी तीन मजली शाळेची इमारत बांधणेकामी शासनाच्या संबधित विभागाकडे प्रस्ताव सादर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०७:- मा.महापौर यांचे शिफारशीने , श्रीमती जाहेदा मोहम्मद रफिक कुरेशी यांचे यादी अन्वये शहरातील स्वच्छता राखणे व नागरीकांचे आरोग्याचे दृष्टीकोनातून स.नं. १०९ मधील महानगरपालिकेच्या जागेवर जनावरे बांधण्यासाठी शेड उभारून सदरची जागा बिफ युनियनला देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

पान नं. ३ वर..

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. १०८:- मा.महापौर यांचे शिफारशीने ,श्री.निलेश भगवान आहेर यांचे यादी अन्वये, पोलिस परेड ग्राऊंड व तालुका क्रिडा संकुल, ६० फुटी रोड व शहरातील इतर ठिकाणी पथदिप असलेले विद्युत पोल मनपाकडे हस्तांतरीत करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे आणि मालेगाव महानगरपालिकेकडील प्रमुख मार्गावरील बांधकाम परवानगी देतांना काही नियम, निकष व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे. मालेगाव महानगरपालिका हद्दीत करण्यात येणाऱ्या कॉक्रीट रस्ते बाबत निकष ठरविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. १०९:- मा.महापौर यांचे शिफारशीने ,श्री.मो.मुस्तकीम मो.मुस्तफा यांचे यादी अन्वये मालमत्ता विभागासाठी स्वतंत्र अधीक्षक / मालमत्ता व्यवस्थापक नेमून पदाची कार्ये निश्चित करणे व आवश्यक कर्मचारी वर्ग, कार्यालय व संगणक सुविधा उपलब्ध करून देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ११०:- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./आस्थापना /२७,२८,२९ / दि. २२/१०/२०२६ अन्वये, मालेगाव महानगर पालिकेतील कर्मचारी १) श्री.सांगळे अनिल बाबुराव २) श्री.राजेश लक्ष्मण बागुल ३) श्रीमती उषा पांडू असम, कनिष्ठ लिपिक वर्ग -०३ यांची मालेगाव महानगरपालिकेतून नाशिक महानगरपालिकेत कायम स्वरूपी बदलीने समावेशन करणेस मान्यता देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे

विषय क्र. १११:- मा.महापौर यांचे शिफारशीने, माजी नगराध्यक्ष दिवंगत डॉ.खलील अहमद अन्सारी यांचे महानगरपालिकेच्या इमारत/शाळा/हॉल/वास्तू/रस्त्याला नामकरण करणे, म्हाळदे शिवार गट नं.३५/३ येथील भागास/चौकास हाजी शेख वाहिद चौक असे नाव देणे, स.नं. ६०/१, नया इस्लामपुरा हमिदुन नियाजी मस्जिद समोरील हॉलला अन्सारी शादी हॉल असे नाव देणे, श्रीमती शानेहिंद निहाल अहमद व श्रीमती हर्षिता भारत लाडके यांचे यादी अन्वये, प्रभाग क्र. १०, आण्णाभाऊ साठे नगर, गणेशवाडी येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे नावाचे प्रवेशव्दार उभारणे, प्रभाग क्र.१० मोची कॉर्नर ते आय.टी.आय. कडे जाणाऱ्या रस्त्यावर श्री.क्षेत्र धर्मवीर स्मशान मारूती मंदिर व श्री.खाटू श्याम बाबा मंदिर या नावाने प्रवेशव्दार उभारणे, श्री.जान्हवी जगदिश कासवे यांचे यादी अन्वये छत्रपती शिवाजी नगर कँम्प येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाची नवीन कमान तयार करून प्रवेश्व्दार उभारणे व कँम्प स.नं.३ अ/४ या परिसरास रेश्माई गांगुर्डे मळा असे नाव देणे व श्री.क्षेत्र धर्मवीर स्मशान मारूती मंदिर व श्री.खाटू श्याम बाबा मंदिर या नावाने प्रवेशव्दार उभारणे व छत्रपती शिवाजी नगर अमरधाम येथे अमरधाम या नावाने कमान उभारणे, श्री.मोहम्मद खालीद अब्दुल रशीद यांचे यादी अन्वये, अली अकबर हॉस्पीटल येथील नव्याने उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीस "श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद" असे नाव देणे श्री.उध्दव दरेकर यांचे यादी अन्वये, नवापुरा वार्ड, स.नं.१२९ येथील मिल्लत मदरसा पासून ते आग्रारोड पर्यंत असलेले रस्त्याला "आयुक्त रविंद्र जाधव मार्ग" असे नाव दणे, श्री.शेख कलीम शेख दिलावर यांचे यादी अन्वये मालेगाव येथील (तांबाकाटा) सुत बाजारास "सुत बाजार चौक" असे नाव देणे, श्री.शेख जावीद शेख अनीस यांचे यादी अन्वये, वार्ड क्र.०३ येथील महाराष्ट्र सायजिंग जवळील आग्रा रोड ते पाक पंजतन रोड या तिनही रोडच्या मध्यभागी असलेल्या सर्कलला "मोहम्मदी सर्कल" असे नाव देणे, श्री.निलेश भगवान आहेर व श्री.निलेश एकनाथ काकडे यांचे यादी अन्वये महादेव घाट संगमेश्वर येथे गणेश कुंडास सामाजिक नेते स्व.भिमादादा गवळी असे नाव देणे, श्री.निलेश भगवान आहेर यांचे यादी अन्वये, मालेगाव कँम्प येथील राजमाता जिजाऊ उद्यानाजवळील चौकास "राजमाता जिजाऊ चौक" असे नाव देणे, प्रभाग क्र.११ पारिजात कॉलनी, स.नं. ५२/१ अ सोयगाव येथील उद्यानास स्व.शांतीलाल संतोष कदम (एस.एस.कदम) असे नाव देणे, श्रीमती खालिदा बानो निसार अहमद यांचे यादी अन्वये मिनारा हॉटेल ते पाक पंजतन चौक ते संजरी चौक पर्यंतच्या ८० फुटी रस्त्यास शेख बशीर रोड असे नाव देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

पान नं. ४ वर..

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ११२ :- आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./स्वच्छता /२८ / दि. २२/१०/२०२६ अन्वये, मालेगाव महानगर पालिकेत "शहर वातावरणीय कृती कक्ष" गठीत करण्यास व त्याबाबतच्या रचनेस व त्रयस्थ तज्ञ सदस्य व संस्था यांना समितीमध्ये घेणे व संस्थेसोबत सामजस्य करार करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(साजिद अहमद हसन अब्बास)
नगरसचिव
मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

टिप:- कार्यालयीन वेळेत विषया संदर्भातील कागदपत्र नगरसचिव विभागात पहाण्यासाठी उपलब्ध आहेत.

नगरसचिव जा.क्र.३२८/ २०२६
दिनांक २२/१०/ २०२६

Scanned with OKEN Scanner